# परिपत्रक

२०१८-२०१९

प्रले(वित्त)/व्यय/23 दिनांक: २५.१२.२०१८

विषय: आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या देयकांचे अधिदान करते वेळी अनामत खाती ठेवावयाच्या ठेव रक्कमांबाबत.

संदर्भ: क्र.एमजीसी/एफ/७७४०, दिनांक २८.११.२०१८.

आर्थिक वर्षाअखेरीपर्यंत पुर्ण झालेल्या कामाचा एकुण खर्च किंवा त्या कामाचा प्रगतीनिहाय खर्च त्याच आर्थिक वर्षात नोंद होणे अपेक्षित आहे. अतएव विविध खात्यांनी प्रमाणित केल्यानुसार संबंधित लेखा अधिकारी यांनी नगरसेवक निधी / प्रभाग समिती निधी व इतर अर्थसंकल्पीय सेवा शिर्षातून, अतिरिक्त आयुक्त/महापालिका आयुक्त यांच्या आदेशान्वये किंवा निविदेतील अटी व शर्तीनुसार देयकातून ठेवावयाच्या नियमित अनामत रक्कमे व्यतिरिक्त काही विशिष्ट रक्कमा अनामत खाती ठेव म्हणून ठेवून देयकाचे अधिदान केलेले आहे.

यास्तव यापुढे कोणत्याही कामामध्ये अतिरिक्त आयुक्त/महापालिका आयुक्त यांच्या आदेशान्वये किंवा निविदेतील अटी व शर्तीनुसार देयकातून ठेवावयाच्या नियमित अनामत रक्कमे व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम देयकातून/अर्थसंकल्पीय तरतूदीतून अनामत खाती ठेव म्हणून ठेवावयाची असल्यास अशा प्रकरणी संबंधित खात्याने त्यांच्या लेखा विभागामार्फत संबंधित अतिरिक्त आयुक्त व अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांची पुर्व मंजूरी प्राप्त करणे आवश्यक असेल.

तरी सर्व खाते प्रमुख/ सहाय्यक आयुक्त/रुग्णालय प्रमुख/उपायुक्त/संचालक (अ.से. व प्र.) यांनी आपल्या अखत्यारित असलेल्या संबंधित कर्मचारीवृंदांना उपरोक्त आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश द्यावेत.

सदर नियम तातडीने अंमलात येईल.

| | | |
|---|---|---|
| (श्री. रामदास आव्हाड) | (श्री. प्रदिप पडवळ) | (श्री संजय सेठी) |
| प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) | प्रमुख लेखापाल (वित्त)प्र | अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) |

---

परिपत्रक

२०१८ - १९

क्र.प्र.ले.वित्त./व्यय/२३, दि.१५.१२.२०१८

प्रत ——————————————यांना ( जादा प्रतीसह) माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता